# नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**त्र्यंबक नाक्याजवळ, नाशिक.**

---

क्र./मुकाअ/वैका/६७४/२०१७
नाशिक, दिनांक, २०/१२/२०१७

## परिपत्रक

**संदर्भ-स्थायी समिती सभा दि.२०/१२/२०१७मध्ये झालेली चर्चा.**

दि.२०/१२/२०१७ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत दलीत वस्ती सुधार योजनेंतर्गत अपुर्ण असलेल्या कामांबाबत चर्चा होवून याबाबत मा.अध्यक्षा व सन्मा. सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच यावरुन गट विकास अधिकारी या योजनेकडे काहीएक लक्ष देत नसल्याचेही निदर्शनास येते व यामुळे आपण समाजातील एका घटकास शासकीय योजनांपासून वंचित असल्याने ही बाब अतिशय गंभीर आहे.

तथापि, सदर योजनेतील अपूर्ण कामे तात्काळ पुर्ण होणेकरीता यापुढे पुढील बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी असे निर्देश आपणास या पत्राद्वारे देण्यात येत आहेत.

१. दलीत वस्ती सुधार योजनेचे सर्व प्रस्ताव यापुढे गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीनेच पाठविण्यात यावे.

२. सदर वस्तीमध्ये शौचालयांकरीता आवश्यक पाणी पुरवठ्याची हमी स्थानिक ग्रामपंचायतीने घेतल्याचे प्रस्तावात नमूद असणे आवश्यक राहील. त्याशिवाय प्रस्ताव पुढे पाठविण्यता येवू नये.

३. सदर वस्तींकरीताचा निधी हा गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यात जमा होत असतो. तथापि, झालेल्या कामांची खात्री न करताच हा निधी ग्रामपंचायतीस वर्ग केला जातो. यापुढे कामांची खात्री न करताच असा निधी वर्ग केल्यास तो अपहार समजून संबंधीतांविरूध्द फौजदारी दाखल करण्यात येईल. तसेच यापुढे देयके ही गट विकास अधिकारी यांचे स्तरावरूनच अदा होतील याची दक्षता घ्यावी.

४. कामांची तांत्रिक जबाबदारी, कामांचा दर्जा, कामांची तपासणी इ.ची सर्व जबाबदारी उप अभियंता-बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांची राहील व कामांच्या दर्जाबाबत तक्रारी आल्यास किंवा नित्कृष्ट दर्जाची कामे झाल्यास त्यांच्या वेतनातून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

५. कामांची प्रशासकीय सर्व जबाबदारी सहाय्यक गट विकास अधिकारी यांची राहील यामुळे सहा. गट विकास अधिकारी यांनी वेळोवेळी या कामांना भेटी देणे आवश्यक राहील. व या कामांना भेटी दिलेबाबतची नोंद त्यांनी त्यांचे मासिक दैनंदिनीत करावी.

६. समाज कल्याण निरीक्षक हे ज्यावेळेस या वस्त्यांना भेटी देण्यासाठी/तपासणीसाठी जातील त्यावेळी त्या-त्या तालुक्यातील सन्मा. जिल्हा परिषद सदस्यांना त्यांनी त्यांचे भेटीबाबत एक दिवस अगोदर अवगत करावे.

सर्व गट विकास अधिकारी/सहा. गट विकास अधिकारी यांनी वरील बाबींचे तंतोतंत पालन करावे असे निर्देश या पत्राद्वारे देण्यात येत आहेत.

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रत कार्यवाहीसाठी -** गट विकास अधिकारी/ सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः**

१. स्वीय सहाय्यक, मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालय.

२. मा.सभापती विषय समिती (सर्व), जिल्हा परिषद नाशिक.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी-**

१. अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.

CHIEF EXECUTIVE OFFICER ZILLA PARISHAD, NASHIK.